# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. २३/१०/२०१३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २३/१०/२०१३ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. १५/१०/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. राजु यशवंत भोईर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजु यशवंत भोईर | सभापती |
| २. | श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो | सदस्य |
| ३. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. प्रमोद जयराम सामंत | सदस्य |
| ६. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७. | श्री. राजेश शंकर वेतोसकर | सदस्य |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | सदस्या |
| ९. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| १०. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ११. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| १२. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| १३. | श्री. संदिप मोहन पाटील | सदस्य |
| १४. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| १५. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| १६. | डॉ. रमेश जैन | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सन्मा. सदस्य, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी वर्ग यांचे स्वागत. तसेच सचिव साहेबांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २३/१०/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १६, दि. १५/१०/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १०४, दि. २८/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**बर्नड डिमेलो :-**

दि. २८/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०४ :-**

दि. २८/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ९३ :-**

दि. २८/०८/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो**      **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण. क्र. १०५, मिरारोड शांतीनगर सेक्टर-९ मधील समाज मंदिर श्री सिध्दकला विश्वस्त मंडळास भाडे तत्वावर देणेबाबत.

**रोहिदास पाटील :-**

ह्या विषयाला सुरुवात करायच्या आधी शहराचे २-३ विषय आहेत. तर त्या विषयावर चर्चा होणे गरजेचे आहे. ह्या शहरामध्ये डेंग्युच्या पेशंट बद्दल अत्यंत भितीचे वातावरण आहे. लोकांमध्ये संभ्रम आहे. जे आपले अधिकारी डेंग्यु बद्दल आता कार्यरत आहेत. तर आजची शहरातली डेंग्यु बद्दल काय स्थिती आहे. महापालिकेचे काय कार्यक्रम सुरु आहेत. महापालिकासाठी काय प्रयत्नशील आहेत. लोकांना विश्वास देण्याच्या दृष्टीने आपण काय करतो. ह्याच निवेदन व्हाव. नंतर आम्ही चर्चा करतो. प्रश्न असा आहे की, लोकांना डेंग्यु झाल्याच सिध्द झाल्यानंतर त्यांच्याकडे नोंद झाल्यानंतर आजारी असेल त्याला वैद्यकिय आपण मदत करतो. मयत झाल तर त्याच्या कुटुंबालाही पैसे देत होतो. आता तुम्ही पैसा देता की नाही देत, वैद्यकिय मदत देतात की नाही? आजारी पेशंट जे डेंग्यु म्हणून सिध्द झालेत किती? डेंग्यु म्हणून किती औषध उपचार होते? आणि मयत किती? ह्या बद्दल तुम्ही रितसर निवेदन करा आणि रेकॉर्डिंग होवू दे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, जानेवारी पासुन ते आतापर्यंत जवळपास आपल्याकडे १२७ केसेस आपण सस्पेक्टेड होते. त्यातले ६० केसेस पॉझिटिव्ह आलेत. आतापर्यंत डेंग्युने जवळपास २ केसेसचा मृत्यू झालेला आहे. साधारणतः डेंग्युच रोग स्वच्छ पाण्यात डास असल्यामुळे होतो. प्रत्येक घराघरामध्ये पाणी साचत फ्रिजमध्ये म्हणा, मनी प्लांटमध्ये हे जनजागृती होणे महत्वाचे आहे. डेंग्युचा डास हा मानवाच्या संसर्गजन्य निसर्गावर राहतो. त्याच्यापुढे त्याला जनजागृती मोठ्या प्रमाणात होण आवश्यक आहे. त्याच आम्ही प्रेजेन्टेशन पण ठेवलेले आहे. सध्या जवळपास २५ मल्टीपरपज वर्कर आहेत. १३० कर्मचारी आहे. औषधाचा साठा आहे. ज्या-ज्या ठिकाणी पॉझिटिव्हकेसेस आल्या त्या ठिकाणी सुध्दा करतो. आणि त्यानुसार त्यांच ब्लड सॅम्पल घेतो आणि कन्फर्म झाल्यानंतर महानगरपालिका कुठल्या प्रकारची, कोणाची डेथ झाली, सस्पेक्ट झाली. तर महानगरपालिकेकडे कुठल्याही प्रकारच प्रोव्हिजन नाही. त्याच पॉझिटिव्ह आल तर फक्त त्याच फॉलोअप ठेवतो.

**रोहिदास पाटील :-**

प्रोव्हिजन कोणत्या महापालिकेत आहे ते नाही. आपल्या महापालिकेत प्रोव्हिजन होती ना. १२०० कोटी रु. आपण संपवतो. जे गरजवंत लोक आहेत. गरिब लोक आहे त्याला तुम्हाला द्यायला काय आहे. ५ कोटी २५ कोटीची इथे मंजुरी घेता. जो खरोखर गरजवंत आहे त्याला तुम्ही काय देता? बंद करण्याची गरज काय पडली, ही महापालिका डब्ब्यात गेली का? महापालिकेला परवडत नाही का? किंवा त्यांना पैसे देवू नका अस कोणी सन्मा. नगरसेवकांनी तुमच्याकडे तक्रार केली का? कोणत्या पक्षाने केली का?

**प्रविण पाटील :-**

यापूर्वी महापौर निधीतुन मदत देत होतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, ह्याचा मिस युज इतका होत होता सस्पेक्टेड घेऊन घेऊन महानगरपालिकेकडून पैसा उगाळण्याचा बऱ्याच वेळा .............

**रोहिदास पाटील :-**

मिस युज महापालिकेचे अधिकारी करत असेल तर तस निवेदन करा. नगरसेवकांनी केल असेल तर तस सांगा.

**प्रविण पाटील :-**

साहेब, सर्व पेपर तपासणी करुन आपण मदत देत होतो. तर त्यात मिस युज होऊ शकत नव्हत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, आमच्याकडे मोजकीच तरतुद आहे अशा प्रत्येक रोगाला महानगरपालिकेने मदत केली तर आपला बजेट पूर्ण होणार नाही. इतक त्याला बजेट लागेल.

**बर्नड डिमेलो :-**

साहेब, तुम्ही असा डेंग्युचा उल्लेख करताना स्वच्छ पाणी, स्वच्छ पाणी हा शब्द सतत तुम्ही वापरता. म्हणजे आपल्याला हे दाखवायच आहे की, मिरा भाईंदर स्वच्छ आहे. आणि घाणीमध्ये मच्छर होत नाही. स्वच्छ पाण्यात होतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तो मलेरीयाचा असतो. त्याच आम्ही प्रेजेन्टेशन केलेल आहे. सर्व सदस्यांना विनंती करतो की, आम्ही सुंदर प्रेजेन्टेशन केलेल आहे. ते प्रेजेन्टेशन आम्ही प्रत्येक सोसायटीला दाखवतो. त्याला जनजागृती होण महत्वाच आहे.

**प्रमोद सामंत :-**

मुंबईमध्ये जागोजागी स्ट्रिट पोलवरती बॅनर टाकलेले आहेत. जवळ-जवळ ४ X २.५०, ४ X ३ चे बॅनर लावलेले आहेत.

**रमेश जैन :-**

साहब आपने बोला ७ केस पॉझिटिव्ह रहता है। क्रायटेरीया क्या है आपके पॉझिटिव्ह का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

टोटल ६० केस पॉजिटिव्ह आए है। मध्यंतरी कमी होते. पण पुन्हा एकदा मध्यंतरी पाऊस झाला ना. आता दुसऱ्या शहरापेक्षा आपली परिस्थिती भाईंदरची तेवढी वाईट नाही. आपण बऱ्यापैकी कंट्रोल मध्ये आहोत. स्पेशल मोहिम केली.

**राजेंद्र जैन :-**

साहब, थोडासा फिल्ड में आए इसलिए बोलना चाहता हूँ। अगर हम डेंग्यु के लिए कंम्पलसेशन की बात करते है। तो डेंग्यु इज कॉम्पुनिबिलीटी है। मच्छर से होती है। तो ऐसे कितनी खटमल की बिमारीयों को नगरपालिका की लायबलिटी मानेंगे? दुसरा सवाल मानसिक रोगो के लिए बडे-बडे बॅनर लगाए गये। मानसिक कार्य यहाँ कितना है। वह देखने का, और मेरे ख्याल से थिएटर के अंदर बडे-बडे पोस्टर लगाके डेंग्यु की प्रिवर्टी मेजर्स है। उसका स्लाईट और बडे-बडे पोस्टर लगाना चाहिए। यह काम करना चाहिए।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डेंग्यु हा व्हाईरल डिसीज आहे. त्याचा प्रसार इजिप्त एडिस ह्या रोगाने होतो. त्याच लक्षण साधारण ताप असतो. हाय फिवर असते. जवळपास १०३-१०४ डिग्री असते. डोके दुखी, बॉडी पेन, सांधे दुखी मळमळते, उलटी होण्यासारख लक्षात येते. आणि अंगावर चट्टे येतात. इजिप्त एडिस डास हा दिवसा चावतो. सहजा सहज मानवाला जास्त चावला. सहजा-सहजी त्याची वस्ती घरातच असते. कुठल्या गटारामध्ये, नाल्यामध्ये हा डास वाढत नसतो. डेंग्युचा आजार स्वच्छ व स्थिर पाण्यामुळे होतो. ते प्रामुख्याने आपल्या वसाहती परिसरात मानव निर्मिती ठिकाणी उदा. फलदाणी, कुंड्या, बश्या, फ्रिज, डब्बे, करवंट्या, टायर, वेगवेगळे डब्बे, बरेच भंगार ठेवलेले असते. मोठ्या-मोठ्या पाण्याच्या टाक्या ठेवलेल्या असतात. ते पाणी पडुन इजिप्त एडिस ह्या डासाच्या अळी मोठ्या प्रमाणात सापडतात. आता पर्यंत जवळपास ६० ठिकाणी घराच्या आत डेंग्युच्या अळ्या सापडल्या. बऱ्याच ठिकाणी जवळपास ६०-७० ठिकाणी वॉर्डात सर्व्हे मी केलेला आहे. सगळा लारवा त्या घरामध्ये सापडलेला आहे. फ्रिजमध्ये, फुलदाण्यामध्ये, मनी प्लांटच्या ठिकाणी त्या ठिकाणी सापडल्या. त्याचे जवळपास ६०-७० ठिकाणी परसेन्टेज आम्हाला आढळून आलेले आहे. आतापर्यंत जवळपास ८५ ठिकाणी घरातले आजाराच आलेल आहे. साचलेले पाणी ७ दिवसापेक्षा जास्त ठेवल तर त्या ठिकाणी लारवाची पैदाईश होऊ शकते. म्हणून सात दिवसानंतर एक कोरडा दिवस पाळला पाहिजे. ह्या ठिकाणी त्याचा लारवा मरुन जातील.

**रोहिदास पाटील :-**

पाणी देतच नाही. रोजच कोरडा दिवस आहे. म्हणून तर सात दिवस पाणी पुरते. माझा प्रश्न ऐकून घ्या. तुम्ही जे प्रयत्न करता तो प्रयत्न पुरेसा आहे का? तुम्हाला काही कमी असेल तर ही सभा मंजुरी देईल. आम्ही अशा दृष्टीने बघतो. काय कमी आहे ते सांगा. पण जे तुम्ही करता प्लेटलेट डाऊन झाल्या. अख्ख कुटुंब किती घाबरते. आणि त्याच बिल किती येते. प्लेटलेट डाऊन झाल्यानंतर किती पेशन्ट गेले. तुम्ही डेंग्युच्या नावाखाली दोन गेले असे सांगता. माझ्याकडे १६ पेशन्टची माहिती आहे. दोन मिनिटात हा विषय संपणार नाही. मा. सभापती साहेब, अत्यंत ह्या शहराचा ज्वलंत विषय आहे. डेंग्युसाठी महापालिका काय करते? आपली तर अशी अपेक्षा आहे की, ज्या अनेक महापालिका चालतात. त्याच्यामध्ये मिरा भाईंदर महापालिका प्रामाणिक प्रयत्न करते. अशी कुठेतरी नोंद झाली पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काका, तुम्ही जे १६ म्हणता त्यापैकी दोन डेथ झालेली आहे. ते कन्फम आहे. त्याची डेथ कमिटी असते. जो पर्यंत कन्फम होत नाही तो पर्यंत आपण डिक्लेर करत नाही.

**रोहिदास पाटील :-**

कन्फम होणार म्हणजे कस होणार? आपल्याकडे कोण कमीटी आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सिव्हील सर्जनचा आपण रिपोर्ट पाठवतो. ते सगळे त्याची डिटेल हिस्ट्री बघतात, त्याला लक्षण बघतात. त्याला ट्रिटमेंट काय दिली ते बघतात. त्यानुसार कन्फम केस डेंग्युने मृत्यू झाला असे घोषित करतात.

**शरद पाटील :-**

पानपट्टे साहेब, काकांनी १६ सांगितले. नुसते १६ नाही तर आमच्याकडे पण ८ आहेत ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डेथचे का?

**शरद पाटील :-**

नाही. डेंग्युचे पेशंट.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आता पण डेंग्युचे पेशंट आहेत ना. मी कुठे नाही म्हणुन म्हणत नाही. पण मी डेथ सांगतो. आतापर्यंत दोनच डेथ झालेले आहे.

**प्रमोद सामंत :-**

साई आर्शिवाद मिरारोडच्या हॉस्पीटलमध्ये त्या डॉक्टरने सांगितल आमच्याकडे डेंग्युचे ३० पेशंट आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सर, कस आहे डेंग्युचे, लेप्टोस्पायरसचे साधारण सारखेच पण सस्पेक्टेड देऊन लोकांना, पेशंटला घाबरवतात.

**मुन्ना सिंह :-**

पानपट्टे साहब, पिछले टाईम में इस विषय में बोला या और आपने अभि तक दो ही काऊंट करके रखा है। में कागज लाया नही। में शाम को देता हूँ। कौन से हॉस्पीटल में कितने लोग ॲडमिट हुए और कितने लोग बाहर निकले।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आमच्याकडे आहे ना. खाजगीमध्ये किती आहेत, महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये किती पेशंट सापडले ते आमच्याकडे डेटा आहे ना.

**मुन्ना सिंह :-**

नगरपालिकेका आपको कौन सा डेटा बताया है। या फिर वहीं डेटा है? क्या काऊंट किया आपने सर्व्हे करके? एक बिल्डींग में हुआ तो १०० मि. गिनती कर रहे है मेजर माप लेके।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ऐसा नहीं है। इसलिए तो शहर में कंट्रोल है।

**मुन्ना सिंह :-**

अपने पास प्रॉब्लेम नहीं है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डेथ नहीं है।

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अस निवेदन करता म्हणून पेपरमध्ये बातमी आलेली आहे. ह्या देशामध्ये महाराष्ट्र राज्य १ नंबरवर आहे. तिथे डेंग्युचे पेशंट जास्त दगावले.

**मुन्ना सिंह :-**

पानपट्टे साहब, जभी हॉस्पीटल में पेशंट जाता है, तो यहाँ के डॉक्टर इतने इमानदार है की, वह ॲडमिट करने के पहले प्लेटलेट कम हुआ तो बोलते है डेंग्यु हुआ है। तो वह कौन देखेगा। उनका बिल तो बड रहा है ना।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

प्लेटलेट २०००-४००० कमी होतील. त्याना डेंग्यु होत नाही. मलेरिया होतो, लेप्टोस्पायरस होतो, कावीळ होते.

**प्रमोद सामंत :-**

ही खरी गोष्ट आहे. आपल्या शहरामध्ये डॉ. आपल बिल वाढवण्यासाठी धंदा होण्यासाठी ही गोष्ट करतात.

**राजेंद्र जैन :-**

आप इतना डॉक्टर के बारेमे क्यों बोल रहे हो।

**मुन्ना सिंग :-**

डॉक्टर साहब, इसमे आपको बुरा मानने की बात नही है। डॉक्टर लोग ऐसा कर रहे है। आप नही करते, वह नही करते लेकीन ऐसे इमानदार डॉक्टर नही है ना।

**प्रमोद सामंत :-**

डॉक्टर साहब आप इसमे एक्स्पेक्शन है। आप बुरा मत मानना। लेकीन यह फॅक्ट है की वह डॉक्टर ने तीन टेस्ट उसका किया। कौनसा टेस्ट डेंग्यु का रहता है।

**राजेंद्र जैन :-**

एन.एस.-१.

**प्रमोद सामंत :-**

हॉ। उसमेसे एक टेस्ट पॉझीटीव्ह था और दो नेगेटीव्ह था। वह पॉझीटीव्ह टेस्ट के लिए घरवाले थे उन्होने दुसरे डॉक्टरसे कन्सर किया तो वह बोलते है इतना सब कुछ नही है। हार्डली ०.२ उनका प्लेटलेट्स कम हुआ था और वह डॉक्टर उस पेशन्ट को बोलता है की मेरे इधर ३० पेशन्ट डेंग्यु के है। आपको दुसरा ओपीनियन लेना है तो मेरा यहॉ आना मत।

**मुन्ना सिंग :-**

रु. १५००/-, रु. १६००/- ब्लड चेक करने का लगता है। उसका भी व्यवस्था नगरपालिका मे करो।

**राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहब, डेंग्यु जब प्रायमरी स्टेज पर कन्फम करते है ना तो नॅशनल ब्लॅक मे लेते है। व्हाईट मे लेते है जो यह लास्ट में डेंग्यु कन्फम है की नहीं। उसके लिए सॅम्पल पुनःभेजना पडता है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अभी सिव्हील सर्जन के यहाँ पर भेजते है।

**राजेंद्र जैन :-**

असल में जब डेंग्यु की स्टार्टींग रिपोर्ट आती है। डेंग्यु हो गया डेंग्यु हो गया कई बार ८० टक्के नहीं भी होता है। आज बोला हुआ २० दिन बाद बोलेगा डेंग्यु नहीं है। इसलिए इतना हायपर होना जरुरी नहीं है। एव्हरीथिंग बेटर ॲन्ड गोईंग ऑन कंट्रोल ॲन्ड डिजीन अपून किसी के घरपे जाके डेंग्यु नही दे रहे है ना। कंडीशन खराब है।

**रोहिदास पाटील :-**

डेंग्युची साथ इतकी जोरात आहे. त्याच्यावर महानगरपालिकेची भूमिका काय आहे ते सांगा. तुम्हाला कसला ठराव पाहिजे. ह्यांनी किती आर्थिक मंजुरी पाहिजे. त्याचा तसा ठराव द्या.

**मुन्ना सिंग :-**

पानपट्टे साहब, खाली ब्लड रिपोर्ट का २-२ हजार रुपया जाता है। उनको फुकट मे उपचार और ब्लड रिपोर्ट भी निकालके दो।

**संदिप पाटील :-**

काका, आमच्या इथे राईला ९ पेशंट डेंग्युचे आहेत.

**रोहिदास पाटील :-**

असू द्या ना. ९ असू दे १०९ असू दे. आपण सहकार्य करणे, आपल्या महापालिकेची भुमिका आहे. आपण गरीबांसाठी धावतो.

**संदिप पाटील :-**

काका त्यांना पालिकेतर्फे थोडस मानधन दिल तर महानगरपालिकेच पण नाव राहिल.

**डॉ. रमेश जैन :-**

१५००० रुपया दो।

**शरद पाटील :-**

धुर फवारणी चालू करा. असे नाही जमणार.

**मुन्ना सिंग :-**

धुर फवारणी दुसरी जगह पर चालु है।

**शरद पाटील :-**

दुसऱ्या ठिकाणी धुर फवारणी चालू आहे तर आपल्याकडे का नाही?

**मुन्ना सिंह :-**

मा. सभापती साहब, मेरा यह कहना था की, ब्लड रिपोर्ट निकालते है तो उनका फालतु में पैसा जाता है। स्टार्टींग में हजार दो हजार जाता है। तो हर जगह मोफत केंद्र चालू करदो। उसका ॲडव्हटाईज करिए की, वहाँ जाके ब्लड चेक कराओ।

**बर्नड डिमेलो :-**

मा. सभापती साहेब, मला वाटते महानगरपालिका आपल्या अन्य आरोग्यसाठी, लोकांकरिता, नागरिकांकरिता भरपूर पैसा खर्च करते. आता आपल्या सन्मा. सदस्यांनी विषय मांडला की, प्रत्येक गोष्ट आपण औषध देण्याअगोदर जर तपासण्यासाठी प्रत्येक पेशंटला साधा ताप असो किंवा काहीही असो त्याला रक्त तपासणीसाठी पाठवतात. त्यांची स्वतःची फिस ३० रु., ५० रु. असते. परंतु, ३००-५०० रुपयाच ब्लड रिपोर्ट काढायला पाठवतात. १४००-१५०० रुपये जातात. तर महापालिका ती सुविधा पुरवू शकतो का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पुरवू शकतो. आपल्याकडे डेंग्यु किट घेऊ शकतो आणि आपण त्याचे ब्लड सॅम्पल चेक करु शकतो. आपली तशी सेवा आहे.

**बर्नड डिमेलो :-**

डॉक्टरांना मी बदनाम नाही करत. डॉ. साहब माफ किजीए। पण, असे प्रकार झाले आहेत की, त्यांना ३० रु. ५० रु. फिस भेटतात. जर चेकअपला गेल तर त्याच्यामध्ये त्यांना २००-३०० रुपये कमिशन भेटत. मग, ते पेशंटला काही नसल तरी पाठवून द्या. तर मला अस वाटत की रक्त तपासणी आपल्या महापालिकेच्या रुग्णालयामध्ये सुविधा उपलब्ध केल्या तर शहराच्या २-४ ठिकाणी रक्त तपासणी चालू केली तर बंद होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अळी कुठे-कुठे उत्पत्ती होते ते सांगतो. घरच्या परिसरामध्ये म्हणजे ड्रम्समध्ये फुलदाण्या, मनी प्लांट, कचऱ्याच्या कुंड्या, ज्या ठिकाणी पाणी साचत त्या ठिकाणी होऊ शकतात. फ्रिजचे डब्बे ज्या-ज्या ठिकाणी टायर ट्यूब्स असतील. भंगार असतील त्याच्यामध्ये ड्रम्स असतील. त्याच पाणी साचल त्या ठिकाणी उत्पत्ती होऊ शकते. साधारण इजिप्त एडिसचा डासाचा लारवा कशा दिसतात. त्या टाईपच दाखवलेल आहे. इजिप्त एडिसचा डास कसा दिसतो. त्याच्या पायावर पट्टया असतात. पंखावर, शरीरावर असतात. बऱ्याच ठिकाणी लोक कबुतरला पिण्यासाठी पाणी ठेवतात. ज्या-ज्या ठिकाणी उत्पत्ती होऊ शकते त्याचे फोटो आहेत. ते तुम्ही बघा. आम्ही प्रत्यक्ष जागोजागी जाऊन केलेल आहे. औषधासाठी आम्हाला ३० लाख रु. लागतील. आणि २० लाख रु. तुम्ही ठरवले. लोकांना डेंग्युच्या उपचारासाठी मदत करण्यासाठी असे ५० लाखाचा आम्ही पुर्नप्रस्ताव मांडतो त्याला मंजुरी दिली की, बऱ्यापैकी आम्ही कंट्रोल करु शकतो.

**मुन्ना सिंग :-**

क्या मदत करेंगे उसमे।

**रोहिदास पाटील :-**

हे जे मागतात त्याला आपण मंजुरी देऊ या. तुम्ही डेंग्यु पेशंट सिध्द झाल्यानंतर, मयत झाल्यानंतर हे आपण देऊ शकतो अस बोला. आम्ही त्याला मान्यता देतो ना. तसा आम्ही ठराव मांडतो. सभा त्याला मंजुरी देते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वैद्यकिय उपचारासाठी जेवढा खर्च लागेल त्याला तेवढा आपण देऊ.

**रोहिदास पाटील :-**

सगळ्या वैद्यकिय उपचाराचा का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तुम्ही ठरवा. ते निर्णय घ्या. ह्याच्याबद्दल आपण निर्णय घ्या.

**मुन्ना सिंग :-**

पानपट्टे साहब, हॉस्पीटलमे लाख लाख देड-देड लाख रुपया होता है। तो वो लोग कहाँसे देंगे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याबद्दल आपण निर्णय घ्या.

**संदिप पाटील :-**

पानपट्टे साहेब, पहिला १० हजार निधी होता तो आता १० चा १५ हजार करा.

**रोहिदास पाटील :-**

डेंग्यु जर सिध्द झाल. त्याने पेपर सबमिट केले. तर त्या कुटुंबाला आपल्या महापालिकेच्या वतीने २५ हजार रु. द्यायचे. अस आपण ठराव मांडतो. त्याची व्यवस्था प्रशासनाने सगळी पूर्ण करावी. असा ठराव घ्या.

**बर्नड डिमेलो :-**

अगोदर आपण मा. महापौर निधीतून देत होतो.

**प्रविण पाटील :-**

पानपट्टे साहेब, ह्याच्यापूर्वी आपण फक्त डेंग्युला न देता दुसऱ्या इतर आजारांना पण देत होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

फक्त डेंग्युसाठी देतो. दुसऱ्या आजारासाठी नाही.

**प्रविण पाटील :-**

पण गेल्यावेळेला देत होतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

४ वर्षांपूर्वी देत होतो.

**प्रविण पाटील :-**

कॅन्सरला देत होतो, एडस्‌वर देत होतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

फक्त डेंग्युलाच मदत देत होतो. ४ वर्षांपूर्वी दिली होती. आतामध्ये दिली नाही.

**शरद पाटील :-**

असा ठराव होऊ शकतो का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

होऊ शकतो. स्टॅन्डीगला अधिकार आहेत.

**राजेश वेतोसकर :-**

मा. सभापती साहेब, माझी सुचना आहे. काका, बोलतात ते बरोबर आहे. अशा प्रकारची पूर्ण डिटेल आपल्या विषय पत्रिकेवर विषय येऊ दे. आपण त्याप्रमाणे मदतीचा ठराव करुन देऊ ना.

**रोहिदास पाटील :-**

आता पूर्ण नियोजनसाठी त्यांना आपण अधिकार देतो. त्यांनी प्रशासकीय प्रक्रिया पूरी करावी.

**ठराव :-**

डेंग्यु झालेल्या रुग्णाची माहिती प्रशासनाने घ्यावी व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे महानगरपालिकेच्या जबाबदार वैद्यकिय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन विहित कागदपत्रांची पुर्तता करुन डेंग्यु झालेल्या रुग्णाला रु. १२०००/- देण्यात यावे असा मी ठराव मांडत आहे व त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**प्रविण पाटील :-**

मदतीचे धोरण ठरवा आणि पुढच्या सभेमध्ये आणि आम्ही मंजूर करुन देतो. कसे धोरण तुम्ही मदत करणार ते.

**राजेंद्र जैन :-**

आप बोल रहे हो २५ हजार रु. देंगे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२५ हजार नहीं बोला। पहले अपून १० हजार देते थे। अभी आप डिसाईड करो।

**संदिप पाटील :-**

१० चे १५ हजार करुन टाका.

**राजेंद्र जैन :-**

किसको?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जिसको पॉझिटिव्ह आया उसको।

**राजेंद्र जैन :-**

चाहे वो अमिर हो या गरिब हो।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

इसका क्रायटेरीया कुछ नहीं था।

**राजेंद्र जैन :-**

इसका मतलब यह हुआ की, अमिर भी होगा अप्रोचेबल होगा उसको मिल जाएगा। गरिब अप्रोच नहीं कर पाएगा तो नहीं मिलेगा। यह क्लिअर कट होना चाहिए। उसमें आपने १० टक्के रखा हुआ है कितना होता है। सॅन्शन लेना पडता है की, इसका आर्थिक परिस्थिती ऐसा है। इसमें भी अप्रोच आना ही चाहिए।

**मुन्ना सिंह :-**

आप जो बोल रहे है वह बराबर है। वह करके लो।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बी.पी.एल. का कोई दाखला किसी को नहीं मिलेगा। अभी तहसिलदार का दाखला लगेगा। जिसका उत्पन्न १ लाख के उपर है ...................

**मुन्ना सिंह :-**

बिमार आदमी दाखला नहीं ला सकता।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कोई भी ला सकता है। उसका आर्थिक परिस्थिती खराब है बोलके।

**संदिप पाटील :-**

पानपट्टे साहेब, दाखला आणता आणता माणूस म्हातारा होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तुम्ही डिसाईड करा काय करायचे ते.

**प्रविण पाटील :-**

मदतीच धोरण ठरवा आणि ते पुढे ठेवा.

**मुन्ना सिंह :-**

नगरसेवक मिल जाऐंगे। लेकिन तहसिलदार को धुंडते धुंडते दुसरे आदमी बिमार हो जाऐंगे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आज तुम्ही पुर्ननियोजनचा ठराव मांडा. पुढच्या सभेत आम्ही काय करु ते सांगू.

**संदिप पाटील :-**

ज्या वॉर्डचे नगरसेवक आहेत त्यांचा दाखला घ्याना तुम्ही.

**रोहिदास पाटील :-**

आजच्या सभेत आम्ही २५ हजारची मागणी केली अशी तुम्ही नोंद घ्या. पुढच्या सभेत प्रशासनाने पूर्तता करुन आणावी. पानपट्टे साहेब, आम्ही तुम्हाला विनंती करतो ज्या ठिकाणी खड्डा, डपका आहे. त्याची लेवल करायला पाहिजे. तर तुम्ही जे.सी.बी. का देत नाही? मी तुम्हाला ह्यासाठी बोलतो हे चारही पेशंट दळवी चाळीच्या बाजुला आहे. दळवी चाळ ही जुनी चाळ आहे ती रोड लेवलच्या दोन फुट खाली आहे. आता ती चाळ तोडलेली आहे. मी फोन करुन दमलो त्यानंतर लेखी पत्र दिलं की, ते जेसीबी ने लेवल करुन ठेवा. कमीत कमी मच्छर तरी निघुन जाईल.

**मुन्ना सिंग :-**

काका, ज्योती बिल्डींग मे ३ है और सक्सेना हॉस्पीटल मे ३-४ है।

**रोहिदास पाटील :-**

मी त्या उमराव बद्दल काहीच बोलत नाही. गरीब माणूस पायरीच चढू शकत नाही. पण त्या दिवशीची परिस्थिती अशी होती की, त्याला उमरावला जाण्यापासून पर्याय नव्हता. ते कुटूंब उमरावमध्ये दोन पेशन्ट घेऊन गेले. काय झाले त्यांचे देव जाणे. म्हणून तर हे विषय मांडतो. मी हे एकासाठी मांडत नाही तर अख्ख्या गावासाठी मांडतो.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

ठिक आहे डेंग्युसाठी जनजागृती साठी स्लाईट तयार केलेली आहे. पुढची स्लाईट घेतील डेंग्यु हा वायरल डिसीज आहे इजिप्त एडीस हा त्याचा व्हॅक्टर आहे त्यामुळे हा डास पसरतो, त्याची लक्षणे साधारण अशी आहे की, ताप १०२-१०३ असतो. डोकेदुखी, बॉडीपेन पण होऊ शकते, सांधे दुखी, मळमळणे त्याला उलट्या होऊ शकतात आणि अंगावर पुरळ येतात. इजिप्त एडीसचा डास दिवसा चावतो आणि मानवाच्या समवेत असतो बाहेर कुठे, गटारात नसतो डेंग्यु हा स्वच्छ परिसर व स्थिर पाण्यातच होतो. महत्वाचं म्हणजे पाण्याच्या टाक्या, फुलदाण्या, कुंड्या, बश्या, फ्रीज ज्या ज्या ठिकाणी पाणी साठवतात, क्रेन ठेवतात, मोठ मोठे ड्रम ठेवतात त्या ठिकाणी त्याची उत्पत्ती होऊ शकते आता पर्यंत जवळपास सर्व्हे केला त्याच्यापेक्षा ६० टक्के ने डेंग्युच्या डासाच्या अळ्या सापडलेल्या आहेत. मेजरींग घरातच अळ्या सापडतात आतापर्यंत ४५ टक्के रुग्णांना घरातच डासाच्या अळ्या आढळून आलेल्या आहे. साचलेले पाणी सात दिवसापेक्षा जास्त ठेवलं तर त्याचा उत्पत्ती होऊ शकते म्हणुन सात दिवसापेक्षा जास्त पाणी साचुन ठेवू नये अशी आम्ही जनजागृतीची मोहिम राबविलेली आहे साधारण हा डास दिसतो कसा त्याच्या अंगावर काळे पांढरे पट्टया असतात त्याच्या छातीवर पायावर आणि पंख्यावर पट्टया असतात साधारण हा डास २१ दिवसामध्ये तयार होतो दोन दिवस त्याची अळी, लारवा, ॲडल्ट आणि फिवफास्ट वेगवेगळ्या स्टेजेस असतात साधारण तो २१ दिवसात ॲडल्ट होतो आणि ॲडल्ट झाल्यानंतर तो चावायला मोकळा होतो साधारण त्याची उत्पत्ती कुठे होते ड्रम्स, फुलदाण्या, मनी प्लांट, कुंड्या, मत्सालय, फ्रिज, वेगवेगळ्या झाडाच्या ठिकाणी, टायर्स ताडपत्र्या, पक्षांसाठी पाणी ठेवतात त्या ठिकाणी पण सापडतात आम्ही सर्व लोकांना विनंती करुन डिस्ट्रॅाय केलेलं आहे साधारण त्या डासाचा लारवा कसा दिसतो? त्याचं डोकं खाली असते आणि शेपूट वर असते ह्या टाईपच्या अळ्या दिसतात लारवानंतर प्युपाची स्टेज आहे. प्युपा ही नंतरची स्टेज आहे ही ॲडल्ट ची स्टेज आहे. साधारण हे लोक झाडाच्या ठिकाणी ठेवतात झाडाच्या खाली प्लास्टिकचे ड्रम ठेवतात त्या ठिकाणी उत्पत्ती आढळून आलेली आहे. फ्रिजच्या ठिकाणी जो एक्स्ट्रा पाणी साचलेलं असते त्या ठिकाणी केलेलं आहे. बऱ्याच ठिकाणी अनवॉन्टेड बकेट पाणी, भंगार ठेवतात त्या ठिकाणी लारवाची उत्पत्ती होते बाटलीमध्ये अळ्या कश्या दिसतात ते दाखवलेलं आहे. बऱ्याच नारळाच्या करवंट्या त्यामध्ये पाणी पडलं तर ते मध्ये खुप कंट्रोलमध्ये केलं होतं पण पुन्हा पाऊस झाला आणि पुन्हा पाणी साचून पुन्हा डिस्ट्रॅाय करायला लागणार आहे. दगडाच्या कुंड्या, रंगाचे डब्बे, ड्रम ह्याठिकाणी टायर्सवर तर आम्ही मोठी कारवाई केली होती. भाईंदर वेस्टला मॅक्सेस मॉलच्या ठिकाणी तेव्हा त्याच्याकडुन ३० हजार रुपये वसुल केले होते. सगळे टायर्समध्ये जमा केले होते. मोठ मोठे पिंप असेल, ड्रम्स असतील ह्या ठिकाणी सुध्दा लारवा आढळून आलेला आहे. लोखंडी जाळ्या मध्ये झाडं ठेवतात त्यामध्ये आढळतात मेजर म्हणजे घरामध्येच फुलदाण्या ठेवतात शोभीवंत झाड ठेवतात त्याठिकाणी त्याची उत्पत्ती होऊ शकते ह्यासाठी नियंत्रण काय केलं पाहिजे? पिण्याच्या पाण्यावर झाकण ठेवलं पाहिजे. ॲटलिस्ट ८ दिवसातुन एक दिवसात स्वच्छ करुन मोकळं केलं पाहिजे. पाण्यात गप्पी मासे सोडतात. गप्पी मासे मोठ-मोठ्या ठिकाणी उत्पत्ती होऊ शकते. बायलॉजीकल कंट्रोल आपण वापरतो. १०-१२ ठिकाणी गप्पी मासांची पैदास सुरु केलेली आहे. त्याचे ते गप्पी मासे घेऊन ज्या ज्या ठिकाणी लारवा तयार होतात त्याठिकाणी सोडतो त्याठिकाणी गप्पी मासे खाऊन टाकतात आणि बायोलॉजीवर कंट्रोल येऊ शकते आम्ही कुठे कुठे जाम घेतलेला आहे त्याचे फोटोस आहेत. आम्ही लोकांना जनजागृत कसे कसे केलेले आहेत. बऱ्याच वॉर्डमध्ये सदस्या, महापौर मॅडम सुध्दा दिसतात. बरेच सदस्य पण आहेत मी पण बऱ्याच ठिकाणी गेलो होतो. आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळला तर बऱ्यापैकी डेंग्युवर कंट्रोल होऊ शकते.

**रोहिदास पाटील :-**

ही जी तुम्ही स्लाईट दाखवली या शहरात थिएटर किती आहेत? असं त्या थिएटरवाल्यांना तुम्ही बोलले होते का?

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

नाही आम्ही आता हे जस्ट तयार केलं आहे.

**रोहिदास पाटील :-**

आतापर्यंत का नाही केलं? पहिलं तुम्ही थिएटरवाल्यांना द्या.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

पॅम्प्लेट्स पण तयार केलेले आहेत प्रत्येक सोसायटीच्या नोटीस बोर्डवर पण लावणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

ही स्लाईट बनवले ते तुम्ही दाखवलं का? नसेल तर आता दाखववायची तयारी करा ती गाडी तयार करा मोठ मोठे नाके आहेत जिथे गर्दीचे ठिकाण आहेत. लोकांचं विरंगुळा असं नाही. लोकांचं प्रबोधन होईल त्याना हे दाखवा असं असं केल्यानंतर या शहरात ह्याचं प्रमाण कमी होईल.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

महानगरपालिकेत १३० कर्मचारी आहेत. टोटल पॉप्युलेशन हे १०-१२ लाख आहेत. प्रत्येक ठिकाणी महानगरपालिका पोहचू शकत नाही. ह्याच्यामध्ये सगळ्यांचा सहभाग पाहिजे तरच ते होऊ शकते म्हणून आम्ही जनजागृतीसाठी प्रत्येक सोसायटीमध्ये पॅम्प्लेट्स वाटणार आहोत प्रत्येक सोसायटीवाल्यांना प्रेजेंन्टेशन दाखवणार आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहब, एक सजेशन है। हर वॉर्ड मे चार हजार घर पडते है। तो चार हजार पॅम्प्लेट्स हम लोगों को दे दो हम दे देंगे।

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

ठिक आहे पुढच्या स्थायी समितीमध्ये पुर्ण नियोजनाचा प्रस्ताव घेऊन येतो त्याला मंजुरी दिली तर बऱ्यापैकी काम करु शकतो.

**अनिता पाटील :-**

साहेब, तुमच्या माहितीसाठी सांगते काल आमच्या प्रभागाची मिटींग झाली आणि तिथे राठोड साहेब त्या वॉर्डचे अधिकारी आहेत त्यांनी आम्हाला हे दाखवलं तर आम्ही सगळ्या नगरसेवकांनी मागणी केली की, प्रत्येकाला एक एक सीडी द्या आम्ही आमच्या लेवलला आमच्या वॉर्डात जनजागृती करु शकतो तशाप्रकारे सगळ्या नगरसेवकांना द्या.

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

हो नक्की देतो.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

साहब, पिछले मिटींग मे आपने बोला था की, सावंत साहब को नगररचना का सवाल था उसका पुरा दावा लेने को बोला था उसका क्या हुआ? सावंत साहब ने तभी बोला था की, नेक्स्ट मिटींग के अंदर नगररचना का पुरा लॅन्ड लिस्ट मे दिया था वह खतम होने वाला था।

**बर्नड डिमेलो :-**

मिरारोड शांतीनगर सेक्टर-९ येथे समाज मंदिर असून सदर समाज मंदिर इमारतीचे क्षेत्र ४९.०० चौ. मीटर एवढे आहे. श्री सिध्दकला विश्वस्त मंडळ, भाईंदर (पू.) यांना समाज मंदिर चालविण्याकरीता सदर जागेची आवश्यकता असून ते भाडे भरण्यास देखील तयार आहेत. सदर जागेचे भाडे बाजारमुल्य (रेडिरेकनर) प्रमाणे रु. २,६८५/- प्रति वर्ष होत आहे. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ रोजीच्या ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या इतर मालमत्ता देखील संस्थांनी भाड्याने मागितल्यास भाडे ठरवून सदर मालमत्ता भाड्याने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेस देण्यात आलेले आहेत.

रु. २,६८५/- (रु. दोन हजार सहाशे पंच्याऐंशी मात्र) वार्षिक भाडे रक्कम ठरवून ५ वर्षे मुदतीसाठी श्री सिध्दकला विश्वस्त मंडळास मिरारोड शांतीनगर सेक्टर-९ येथील समाज मंदिर करारनामा करुन भाड्याने देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**प्रमोद सामंत :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. सभापती साहेब, माझी ह्या ठरावाला सुचना आहे मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १९/०१/२०१३ ठराव क्र. ४१ अन्वये भाईंदर (पूर्व) नवघर स्मशानभूमी जवळील व्यायामशाळा भाड्याने देणेकरीता रु. ६०००/- प्रति वर्ष या दराने मे. जय भवानी प्रतिष्ठान, नवघर या संस्थेस करारनामा करुन ५ वर्षे मुदतीसाठी जागा भाड्याने देण्यास मान्यता दिलेली आहे. सदर संस्था लोकोपयोगी कामासाठी व्यायामशाळा वापरीत असून त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नामधून लाईट बिल, पाणी बिल भरावे लागते. त्यामुळे सदर भाडे जास्त वाटते. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र. ४१ अन्वये या पुढील मालमत्ता भाड्याने द्यायचे अधिकार स्थायी समितीला असल्याने नवघर स्मशानभूमी जवळील व्यायामशाळेचे भाडे रु. ६०००/- ऐवजी रु. १८००/- प्रति वर्ष आकारण्यात यावे.

**संदिप पाटील :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, मला एवढचं विचारायचं आहे की, आपण ह्यांना भाडं किती लावलं २६८५/- रुपये आणि त्यांनी आता किती घेतलं १८००/- रुपये नियमात ते बसत असेल तर त्याला आमचा विरोध नाही पण माझं हे म्हणणं आहे की, तुम्ही जे आता एक एक घेतात ना ते पुर्ण मिरा भाईंदरचं एकदाच घेऊन करुन टाका ना.

**प्रमोद सामंत :-**

जसे ते लोक मागणी करतात तसे आपण देतो ना मागणी प्रत्येकाने केलेली आहे.

**राजेश वेतोसकर :-**

हा विषय जो आहे तर बाकी इतर व्यायाम शाळा ज्या आहेत त्याच आपण सहा हजारचं १८००/- रुपये केलं होतं तर त्या प्रमाणेच त्यांनी डिमांड केलेलं आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०५ :-**

मिरारोड शांतीनगर सेक्टर-९ मधील समाज मंदिर श्री सिध्दकला विश्वस्त मंडळास भाडे तत्वावर देणेबाबत.

**ठराव क्र. ९४ :-**

मिरारोड शांतीनगर सेक्टर-९ येथे समाज मंदिर असून सदर समाज मंदिर इमारतीचे क्षेत्र ४९.०० चौ. मीटर एवढे आहे. श्री सिध्दकला विश्वस्त मंडळ, भाईंदर (पू.) यांना समाज मंदिर चालविण्याकरीता सदर जागेची आवश्यकता असून ते भाडे भरण्यास देखील तयार आहेत. सदर जागेचे भाडे बाजारमुल्य (रेडिरेकनर) प्रमाणे रु. २,६८५/- प्रति वर्ष होत आहे. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ रोजीच्या ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या इतर मालमत्ता देखील संस्थांनी भाड्याने मागितल्यास भाडे ठरवून सदर मालमत्ता भाड्याने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेस देण्यात आलेले आहेत.

रु. २,६८५/- (रु. दोन हजार सहाशे पंच्याऐंशी मात्र) वार्षिक भाडे रक्कम ठरवून ५ वर्षे मुदतीसाठी श्री सिध्दकला विश्वस्त मंडळास मिरारोड शांतीनगर सेक्टर-९ येथील समाज मंदिर करारनामा करुन भाड्याने देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. प्रमोद सामंत**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रविण पाटील व अनुमोदक श्री. संदिप पाटील ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि. १९/०१/२०१३ ठराव क्र. ४१ अन्वये भाईंदर (पूर्व) नवघर स्मशानभूमी जवळील व्यायामशाळा भाड्याने देणेकरीता रु. ६०००/- प्रति वर्ष या दराने मे. जय भवानी प्रतिष्ठान, नवघर या संस्थेस करारनामा करुन ५ वर्षे मुदतीसाठी जागा भाड्याने देण्यास मान्यता दिलेली आहे. सदर संस्था लोकोपयोगी कामासाठी व्यायामशाळा वापरीत असून त्यांना मिळणाऱ्या उत्पन्नामधून लाईट बिल, पाणी बिल भरावे लागते. त्यामुळे सदर भाडे जास्त वाटते. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र. ४१ अन्वये या पुढील मालमत्ता भाड्याने द्यायचे अधिकार स्थायी समितीला असल्याने नवघर स्मशानभूमी जवळील व्यायामशाळेचे भाडे रु. ६०००/- ऐवजी रु. १८००/- प्रति वर्ष आकारण्यात यावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०६, पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**रोहिदास पाटील :-**

पुर्ननियोजन करण्याची भुमिका काय आहे? साहेब, ही जी ५ कोटीची तरतुद केलेली आहे. ५ कोटी मधुन ज्या हेड खाली आहे तो हेड काय आहे?

**दिपक खांबित :-**

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पादचारी मार्ग अंडर पास ह्याकामाकरीता आपण बजेटला तरतुद केलेली आहे. दरम्यानच्या काळामध्ये आपण हे जे काम आहे ते एमएमआरडीए च्या निधीतुन करण्याकरीता प्रस्ताव आपला सुरु आहे आणि पाठपुरावा ५ ते ६ महिन्यापासुन स्वतः मा. आयुक्त साहेब करत आहेत. ह्या एकुण प्रोजेक्ट करिता आपल्याला ३० कोटीचा खर्च आहे म्हणजे आम्ही जे २ वर्षापूर्वी इस्टीमेंट केलं होतं त्याठिकाणी ३० कोटी रुपये आपल्याला लागतील पाच ठिकाणी छोटे अंडर पास बांधण्याकरीता कारण खर्च जास्त असल्यामुळे आपण त्यांच्याकडे पाठपुरावा करतो तर एमएमआरडीए मार्फत ती कारवाई सुरु आहे. दरम्यानच्या काळात जर एमएमआरडीए ने ह्या कामाला मंजुरी नाही दिली आणि जर आपल्याला करायला लागणार असेल तर त्याकरीता कंन्सलटंट नेमण्याकरीता टेंडरसुध्दा मागवून ठेवलेलं आहे. जसं एमएमआरडीएचं पत्र येईल जर ते नाही सांगितलं तर स्टँडींगमध्ये विषय ठेवू कंन्सलटंट नेमल्यानंतर ३ महिन्यामध्ये ह्याचा रिपोर्ट तयार करेल हे जे ब्रिजची कामे

आहेत ह्याला किती खर्च काय आहे? त्यानंतर तो विषय मा. महासभेमध्ये जाईल. २ ते ३ महिन्यामध्ये ह्याचं इस्टीमेट आलं तर मा. महासभेत जाईल आणि मा. महासभेची मंजुरी होऊन नंतर ते टेंडर निघेल आणि ह्या सगळ्या प्रोसिजरला ५ ते ६ महिने लागतील आणि आपला जो पैसा आहे हा कुठल्याही परिस्थीती मध्ये ३१ मार्च २०१३ पर्यंत खर्च होणार नाही हे आपण अशा करीता ठेवले होते की, उद्या जरी एमएमआरडीए ने काम मंजुर केलं तरी आपला काहीतरी हिस्सा रहायला पाहिजे. ह्याकरीता आपण हे पैसे ठेवले होते त्यामुळे हा पैसा कुठल्याही परिस्थीतीमध्ये ह्यावर्षी खर्च होणार नाही. म्हणुन आम्ही आमचे जे काही हेड आहेत तिथे थोडे फार पैसे लागतात त्याच्यामुळे आमच्या डिपार्टमेंट असल्यामुळे आम्ही तो विषय आणला आहे आणि ज्याच्या डिपार्टमेंटला पैसे फिरवायचे असतील तर तो अधिकार पुर्णतः स्थायी समितीचा आहे त्यामुळे आम्ही स्थायी समिती समोर विषय आणलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही विषय आणलेला आहे. तुम्ही सांगता की, तुम्ही एमएमआरडीए कडे मागणी केलेली आहे. मी तुम्हाला खात्रीने सांगतो की, एमएमआरडीए ने ह्या हेड मध्ये तुम्हाला देणार नाही असे सांगितले आहे. त्याचं पत्र माझ्याकडे आहे. मी ते तुम्हाला पत्र वाचून दाखवतो.

**दिपक खांबित :-**

तारीख काय आहे?

**रोहिदास पाटील :-**

०६/११/२०१२.

**दिपक खांबित :-**

तुमचं बरोबर आहे त्यांनी आम्हाला ही तेच सांगितलं. त्यानंतर आम्ही मा. आमदार, मा. खासदार संजीव नाईक साहेब, मा. महापौर मॅडम, प्रताप सरनाईक साहेब ह्यांची आम्ही वेळोवळी एमएमआरडीए कडे बैठका घेतल्या आणि त्यांना सांगितलं, तुम्ही जर हा नियम आम्हाला लावत असतील तर तुम्ही जो बीएमसी मध्ये काम करतात. मुंबई महानगरपालिका हद्दीत ते एमएमआरडीए मध्ये आहे. तुम्ही सायनचा रस्ता घेता, मुंबईतले कुठलेही रस्ते सांगा ते सगळे एमएमआरडीए ने केले ना असं त्यांना आम्ही पटवून दिल की, तुम्ही मुंबई मधले सगळे रस्ते करुन देतात ते सगळे रस्ते इंटरनल आहेत हा जो मिरा भाईंदरचा मेन रस्ता आहे तो मुंबईला जोडणारा रस्ता आहे. मुंबई मधला जो गोराई भाग आहे त्याला हा जोडणारा रस्ता आहे हा मिरा भाईंदरचा इंटरनल रस्ता नाही ह्या रस्त्यावरुनच मिरा भाईंदर वरुन मुंबई महानगरपालिकेत प्रवेश करतो. हे त्यांना पटवून दिल्यानंतर त्यांची टीम एक महिन्यापूर्वी पुन्हा आली आणि त्यांना पाचही म्हणजे एक रस्ता नाही. काशिमिरा रस्ता झाला. त्यानंतर दुसरा रस्ता जेसलपार्क घोडबंदर रस्ता तिसरा रस्ता दहिसर लिंक रस्ता वेस्ट वरुन त्यानंतर उत्तनला जाण्याकरीता जो रस्ता आहे तो छोटा रस्ता आहे. सुभाष चंद्र बोस मैदानाच्या पाठीमागुन जो डीपी रस्ता आहे तो मोर्व्याला दत्त मंदीर कडुन निघतो तो रस्ता असे हे पाच रस्ते त्यांना आपण दाखवले आणि त्यांनी त्याचं प्रपोजल तयार केलं आणि त्या फाईल वर ॲडीशनल कमिश्नरची पण सही झाली. आता फक्त अकाऊंट डिपार्टमेंट आणि कमिशनरची सही झाल्यावर मुख्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाची कमिटी आहे त्याच्यासमोर हा विषय झाले आणि त्याच्यामध्ये निर्णय होईल अशी त्याची ही सद्यस्थिती आहे त्यामुळे आपल्याला प्रयत्न करायला काही हरकत नाही.

**रोहिदास पाटील :-**

प्रयत्न नाही अभिनंदन करा जर एमएमआरडीए कडुन आपल्याला कोट्यावधी रुपयाचा निधी मिळाला तर पात्र आहे. पण एमएमआरडीएची अशी भुमिका असेल आपण त्याचा एकही पार्ट का करु नये. आपण निधी त्याच्यासाठी ठेवलेला आहे. आपण अर्थ संकल्पात तरतुद केली ते कामच बाजुला काढुन ५ कोटीचं एक पण काम तुम्ही का काढत नाही? एक काम काढा एक कुठला तरी पादचारी पुल घ्या आज गोल्डन नेस्ट नाल्यापासुन ते काशिमिरा नाक्यापर्यंत अनेक ठिकाणी लोकांना क्रॉस करण्यामध्ये त्रास होतो. ट्रॉफिकलाही त्रास होतो. सिग्नल पास करताना ट्रॅफिक जाम होते. एकतरी तुम्ही घ्याल की नाही तुम्ही जर पैशेच फिरवत असाल............

**दिपक खांबित :-**

घेतो ना म्हणुन तर दरम्यानच्या काळात आपण कंन्सल्टंट नेमलेला टेंडरसुध्दा मागवुन ठेवलेला आहे. जसं एमएमआरडीएचं पत्र येईल त्याच्या दुसऱ्या दिवशी आम्ही स्टँडींगला विषय ठेवणार कारण ही सगळी कनेक्टीवीटी आहे ना ह्याकरीता ब्रिजची साईज काय आहे? त्याची डिझाईन काय? दोन ठिकाणी आपले पादचारी पुल आहेत गोल्डन नेस्टला आणि काशिमिरा नाक्याला आणि बाकीच्या पाच ठिकाणी छोटे ब्रिज आहेत तर ह्याचं कंस्ट्रक्शन करण्याकरीता प्लान एस्टीमेट करण्याकरीता आपण कंन्सल्टंटचं टेंडर सुध्दा येऊन आपल्याकडे पडलेलं आहे फक्त आम्ही वाट बघतो.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा सन २०१३-१४ या वर्षाचा अर्थसंकल्प मा. महासभा दि.२६/०३/२०१३ ठराव क्र. ७५ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सदर अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाखाली तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तथापी काही लेखाशिर्षात करण्यात आलेल्या तरतूदी कमी पडत असल्याने सदर वाढीव तरतूदी पुर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता आहे. सदर पुर्नविनियोजन पत्रक खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे.

**नमूना क्र. १० नियम ३० (३) पहा.**

| या शिर्षातून | | | | | | हया शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मूळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मूळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | विकास आराखडा अंमलबजावणी (पृ.क्र. ४६) | श्री. छत्रपती शिवाजी महाराज क्रॉस रोडवरील पादचारी मार्ग/अंडरपास | ५००.०० लक्ष | - | ५००.०० लक्ष | स्मशानभूमी / (पृ.क्र. ४४)<br><br>सार्वजनिक बांधकामे (पृ.क्र.४५)<br><br>सार्वजनिक बांधकामे (पृ.क्र.४५)<br><br>कोंडवाडे (पृ.क्र. ३५)<br><br>बांधकामे (पृ.क्र.३७) | स्मशानभूमी / दफनभूमी विकास खर्च / बांधकाम<br><br>नविन गटारे / नाले बांधकाम<br><br>मैदाने विकास / आर.जी.<br><br>कोंडवाडा दुरुस्ती व बांधकामे<br><br>गटारे / दुरुस्ती झाकणे बसविणे | ४०.०० लक्ष<br><br>८००.०० लक्ष<br><br>७५.०० लक्ष<br><br>५.०० लक्ष<br><br>१५०.०० लक्ष | १९.६० लक्ष<br><br>१०१.४० लक्ष<br><br>-<br><br>-<br><br>५९.३३ लक्ष | २०.०० लक्ष<br><br>१००.०० लक्ष<br><br>१०.०० लक्ष<br><br>५.०० लक्ष<br><br>११०.०० लक्ष | "श्री. छत्रपती शिवाजी महाराज क्रॉस रोडवरील पादचारी मार्ग / अंडरपास" या लेखाशिर्षात रु. ५००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षकाखाली दि.३१/०३/२०१४ पर्यत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन "स्मशानभुमी /दफनभुमी विकास खर्च/ बांधकाम" या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लक्ष, "नविन गटारे/ नाले बांधकाम" या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष, " मैदाने विकास/ आर.जी." या लेखाशिर्षाखाली रु. १०.०० लक्ष, "कोंडवाडा दुरुस्ती व बांधकामे" या लेखाशिर्षाखाली रु. ५.०० लक्ष, "गटारे दुरुस्ती/ झाकणे बसविणे" या लेखाशिर्षाखाली रु.११०.०० लक्ष,<br><br>"सार्वजनिक उद्यान (विद्युत दुरुस्ती) या लेखाशिर्षाखाली रु.१०.०० लक्ष, |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | विद्युत दुरुस्ती (पृ.क्र. ४१) | सार्व. उद्यान (विद्युत दुरुस्ती) | २५.०० लक्ष | - | १०.०० लक्ष | □सार्वजनिक इमारती सिग्नल/ जनरेटर/सी.सी. कॅमेरा दुरुस्ती (विद्युत दुरुस्ती) या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लक्ष, □विद्युत दाहिनी (काशिमिरा) या लेखाशिर्षाखाली रु.५०.०० लक्ष, □बाजारपेठा देखभाल दुरुस्ती□ या लेखाशिर्षाखाली रु.२.५० लक्ष, □सार्वजनिक इमारती/ सिग्नल□ (विद्युत विजबिल) या लेखाशिर्षाखाली रु.५०.००लक्ष,□शाळा विजबिल/विद्युत दुरूस्ती□या लेखाशिर्षाखाली रु.१०.०० लक्ष, सर्वधर्मीय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष, □उद्याने विकास/नविन बांधकाम□ या लेखाशिर्षाखाली रु. २५.०० लक्ष, व □कुंपणे व उद्यानाची दुरूस्ती□ या लेखाशिर्षाखाली ५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | | | | विद्युत दुरुस्ती (पृ.क्र. ४१) | सार्व. इमारती सिग्नल / जनरेटर / सी.सी. कॅमेरा दुरुस्ती | १५.०० लक्ष | ८.२३ लक्ष | २०.०० लक्ष | |
| | | | | | | स्मशानभुमी (पृ.क्र.४४) | विद्युत दाहिनी | १.०० लक्ष | - | ५० लक्ष | |
| | | | | | | बाजारपेठा आणि कत्तलखाने (पृ.क्र. ३५) | बाजारपेठा देखभाल दुरुस्ती | २.०० लक्ष | - | २.५० लक्ष | |
| | | | | | | विद्युत विजबिल (पृष्ठ क्र. ४१) | सार्वजनिक इमारती/सिग्नल | ५०.००लक्ष | ४७.७४ लक्ष | ५०.०० लक्ष | |
| | | | | | | | शाळाविजबिल/ विद्युत दुरूस्ती | २०.००लक्ष | १२.०० लक्ष | १०.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३७ | सर्वधर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर | १०० लक्ष | ९९.१० लक्ष | ५०.०० लक्ष | |
| | | | | | | वृक्षप्राधिकरण पृष्ठ क्र. ५ | उद्याने विकास/नविन बांधकाम | १५.०० लक्ष | १४.७८ लक्ष | २५.०० लक्ष | |
| | | | | | | वृक्षप्राधिकरण पृष्ठ क्र. ५ | कुंपणे व उद्यानाची दुरूस्ती | ५.०० लक्ष | २.६५ लक्ष | ५.०० लक्ष | |
| २ | सामान्य प्रशासन | - | ४५.०० लक्ष | १६.०२ लक्ष | २८.९८ लक्ष | पदाधिकारी अधिकारी नविन | - | २०.०० लक्ष | १५.८३ लक्ष | ९.०० लक्ष | पदाधिकारी, अधिकारी यांना |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पेट्रोल इंधन वाहन दुरूस्ती | | | | | वाहन खरेदी | | | | | नविन वाहने खरेदी करणे या लेखाशिर्षातील तरतुद सपूष्टात आल्याने कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग) यांचेकरीता दोन नविन वाहन (स्वीफ्ट डीझायर) खरेदी करणेकरीता सामान्य प्रशासन  पेट्रोल इंधन वाहन दुरूस्ती या लेखाशिर्षातुन रु. ७.०० लाख तरतुद पदाधिकारी अधिकारी नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन करणेस मान्यता मिळणेस शिफारस असे. |

वरील प्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**राजेश वेतोसकर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, माझी सुचना आहे सदर पूर्नविनियोजन पत्रकास मान्यता दिल्याने व तरतुद उपलब्ध झाल्याने मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. १० मधील इमारत क्र. बी/७, ८ ते अे/२३ पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे कामी रु. ४०,६३,२००/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०६ :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा सन २०१३-१४ या वर्षाचा अर्थसंकल्प मा. महासभा दि.२६/०३/२०१३ ठराव क्र. ७५ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सदर अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षाखाली तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तथापी काही लेखाशिर्षात करण्यात आलेल्या तरतूदी कमी पडत असल्याने सदर वाढीव तरतूदी पुर्नविनियोजनाव्दारे उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता आहे. सदर पुर्नविनियोजन पत्रक खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे.

**नमूना क्र. १० नियम ३० (३) पहा.**

| या शिर्षातून | | | | | | हया शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मूळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मूळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | विकास आराखडा अंमलबजावणी (पृ.क्र. ४६) | श्री. छत्रपती शिवाजी महाराज क्रॉस रोडवरील पादचारी मार्ग/अंडरपास | ५००.०० लक्ष | - | ५००.०० लक्ष | स्मशानभूमी / (पृ.क्र. ४४) | स्मशानभूमी / दफनभूमी विकास खर्च / बांधकाम | ४०.०० लक्ष | १९.६० लक्ष | २०.०० लक्ष | “श्री. छत्रपती शिवाजी महाराज क्रॉस रोडवरील पादचारी मार्ग / अंडरपास” या लेखाशिर्षात रु. ५००.०० लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षकाखाली दि.३१/०३/२०१४ पर्यत होणारा खर्च पाहता सदर लेखाशिर्षातुन “स्मशानभुमी /दफनभुमी विकास खर्च/ बांधकाम” या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लक्ष, “नविन गटारे/ नाले बांधकाम” या लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लक्ष, “ मैदाने विकास/ आर.जी.” या लेखाशिर्षाखाली रु. १०.०० लक्ष, “कोंडवाडा दुरुस्ती व बांधकामे” या लेखाशिर्षाखाली रु. ५.०० लक्ष, “गटारे दुरुस्ती/ झाकणे बसविणे” या लेखाशिर्षाखाली रु.११०.०० लक्ष, |
| | | | | | | सार्वजनिक बांधकामे (पृ.क्र.४५) | नविन गटारे / नाले बांधकाम | ८००.०० लक्ष | १०१.४० लक्ष | १००.०० लक्ष | |
| | | | | | | सार्वजनिक बांधकामे (पृ.क्र.४५) | मैदाने विकास / आर.जी. | ७५.०० लक्ष | - | १०.०० लक्ष | |
| | | | | | | कोंडवाडे (पृ.क्र. ३५) | कोंडवाडा दुरुस्ती व बांधकामे | ५.०० लक्ष | - | ५.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे (पृ.क्र.३७) | गटारे / दुरुस्ती झाकणे बसविणे | १५०.०० लक्ष | ५९.३३ लक्ष | ११०.०० लक्ष | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | विद्युत दुरुस्ती (पृ.क्र. ४१) | सार्व. उद्यान (विद्युत दुरुस्ती) | २५.०० लक्ष | - | १०.०० लक्ष | "सार्वजनिक उद्यान (विद्युत दुरुस्ती) या लेखाशिर्षाखाली रु.१०.०० लक्ष, "सार्वजनिक इमारती सिग्नल/ जनरेटर/सी.सी. कॅमेरा दुरुस्ती (विद्युत दुरुस्ती) या लेखाशिर्षाखाली रु. २०.०० लक्ष, "विद्युत दाहिनी (काशिमिरा) या लेखाशिर्षाखाली रु.५०.०० लक्ष, "बाजारपेठा देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाखाली रु.२.५० लक्ष, "सार्वजनिक इमारती/ सिग्नल" (विद्युत विजबिल) या लेखाशिर्षाखाली रु.५०.००लक्ष,"शाळा विजबिल/विद्युत दुरूस्ती"या लेखाशिर्षाखाली रु.१०.०० लक्ष, सर्वधर्मीय उत्सव मंडप / लाईट व इतर व्यवस्था या लेखाशिर्षाखाली रु. ५०.०० लक्ष, "उद्याने विकास/नविन बांधकाम" या लेखाशिर्षाखाली रु. २५.०० लक्ष, व "कुंपणे व उद्यानाची दुरूस्ती" या लेखाशिर्षाखाली ५.०० लक्ष एवढी रक्कम वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | | | | विद्युत दुरुस्ती (पृ.क्र. ४१) | सार्व. इमारती सिग्नल / जनरेटर / सी.सी. कॅमेरा दुरुस्ती | १५.०० लक्ष | ८.२३ लक्ष | २०.०० लक्ष | |
| | | | | | | स्मशानभुमी (पृ.क्र.४४) | विद्युत दाहिनी | १.०० लक्ष | - | ५० लक्ष | |
| | | | | | | बाजारपेठा आणि कत्तलखाने (पृ.क्र. ३५) | बाजारपेठा देखभाल दुरुस्ती | २.०० लक्ष | - | २.५० लक्ष | |
| | | | | | | विद्युत विजबिल (पृष्ठ क्र. ४१) | सार्वजनिक इमारती/सिग्नल | ५०.००लक्ष | ४७.७४ लक्ष | ५०.०० लक्ष | |
| | | | | | | | शाळाविजबिल/ विद्युत दुरूस्ती | २०.००लक्ष | १२.०० लक्ष | १०.०० लक्ष | |
| | | | | | | बांधकामे पृष्ठ क्र. ३७ | सर्वधर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर | १०० लक्ष | ९९.१० लक्ष | ५०.०० लक्ष | |
| | | | | | | वृक्षप्राधिकरण पृष्ठ क्र. ५ | उद्याने विकास/नविन बांधकाम | १५.०० लक्ष | १४.७८ लक्ष | २५.०० लक्ष | |
| | | | | | | वृक्षप्राधिकरण पृष्ठ क्र. ५ | कुंपणे व उद्यानाची दुरूस्ती | ५.०० लक्ष | २.६५ लक्ष | ५.०० लक्ष | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सामान्य प्रशासन पेट्रोल इंधन वाहन दुरूस्ती | - | ४५.०० लक्ष | १६.०२ लक्ष | २८.९८ लक्ष | पदाधिकारी अधिकारी नविन वाहन खरेदी | - | २०.०० लक्ष | १५.८३ लक्ष | ९.०० लक्ष | पदाधिकारी, अधिकारी यांना नविन वाहने खरेदी करणे या लेखाशिर्षातील तरतुद सपूष्टात आल्याने कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग व पाणीपुरवठा विभाग) यांचेकरीता दोन नविन वाहन (स्वीफ्ट डीझायर) खरेदी करणेकरीता सामान्य प्रशासन पेट्रोल इंधन वाहन दुरूस्ती या लेखाशिर्षातुन रु. ७.०० लाख तरतुद पदाधिकारी अधिकारी नविन वाहन खरेदी या लेखाशिर्षात पुर्नविनियोजन करणेस मान्यता मिळणेस शिफारस असे. |

वरील प्रमाणे पुर्नविनियोजन पत्रकास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदन :- श्री. राजेश वेतोसकर**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. प्रमोद सामंत व अनुमोदक श्रीम. शर्मिला बगाजी ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर पूर्नविनियोजन पत्रकास मान्यता दिल्याने व तरतुद उपलब्ध झाल्याने मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. १० मधील इमारत क्र. बी/७, ८ ते अे/२३ पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे कामी रु. ४०,६३,२००/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०७, निविदांना मान्यता देणे. (महिला व बालकल्याण विभाग)

**डॉ. राजेंद्र जैन :-**

इस विषय के अंतर्गत थोडीसी जानकारी चाहीए। यह जो आपने जिनको सिलेक्ट किया है उनका टिचर, सर का क्वॉलिफिकेशन क्या है? फिर यह जो कोर्स है उसकी मुदत क्या है? उनको सर्टीफिकेट किस आधार पर देंगे की, इनका कोर्स अच्छी तरह से पुरा हो गया है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, हा तीन महिन्याचा कोर्स आहे. त्याचं आपण सर्टीफिकेट देणार आहोत, त्याची ट्रेनिंग दिल्यानंतर परिक्षा घेणार आहोत, त्यानंतर सर्टीफिकेट देणार आहोत.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

परिक्षेका सब्जेक्ट क्या है? उसमे क्या क्या सिखाया जायेगा?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

पॅटर्न डिसाईन करणार आहोत. एक्झामला काय पेपर असला पाहिजे त्यासंदर्भात आम्ही तयारी सुरु केलेली आहे. अजुन एक्सपर्ट लोकांना बोलवणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जे प्रस्ताव आणता ते प्रस्ताव आणायच्या आधी पॅटर्न तयार करावं असं तुम्हाला वाटत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

टेलरींग चा विषय आहे. प्रशिक्षण ह्या संदर्भात आलं ज्याला एक्सपिरीएन्स आहे त्याला ...............

**रोहिदास पाटील :-**

ही पॉलिसी महापालिकेची आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त ) :-**

हो ही महानगरपालिकेची पॉलिसी आहे ज्याला टेलरींग एक्सपर्ट कोर्स..............

**डॉ. राजेंद्र जैन :-**

